REGISTERED No. B. 3434

# अर्थ

**अर्थ**

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार,
इत्यादि विषयांस वाहिलेलें साप्ताहिक.

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.

*वर्गणीचे दर :*

वार्षिक : ६ रु. सहामाही : ३ रु.

किरकोळ अंक : ९ आ.

*जाहिरातीचे दर :*

कागदाच्या व इतर अटी जाहिरातवाल्याकडून मागवाव्यात.
चेक, मनिऑर्डरी, इ. पाठविण्याचा पत्ता:–

"अर्थ"
"दुर्गाधिवास" पुणें ४.

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

वर्ष १६ | पुणें, बुधवार तारीख २९ मार्च, १९५० | अंक १३

## सी. पी. अँड बेरार (मध्यप्रदेश) प्रोव्हिन्शल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, नागपूर.

स्थापनाः—१९१२.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | २०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | १०,२४,००० |
| रिझर्व व इतर फंड | रु. | ११,१६,००० |
| खेळतें भांडवल | रु. | १,४९,६४,००० |

अध्यक्षः— सर माधवराव देशपांडे, के. बी. ई.

**बँकिंगचे सर्व व्यवहार होतात.**

बँकेचे शेअर्सची विक्री चालू आहे. गेल्या ४ वर्षांची मुनाफा वांटणी पांच दरानें केली.

सरकारची पूर्ण हमी असलेले शेंकडा तीन व्याजाच्या दराचे रोख्यांची विक्री चालू आहे. रोख्यांची मुदत १० व १५ वर्षांनीं भरेल.

विमा कंपन्या, बँका, म्युनिसिपालिट्या, शाळा, जमीनदार वगैरेंनीं वरील रोखे जरूर खरेदी करावेत.

गो. आ. भोंसुले,
मॅनेजर.

फोनः ३४५११ तारः SAHYOG

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.


**उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—**

सूत, रसायनें, रंग, कच्ची कातडीं व चामडीं, कातडी कमाविण्यास लागणारा माल, कमावलेलें कातडें, इ., मशीन. टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

**खालील मालाच्या विक्रीस सहाय्य करतेः —**

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस अँड क्रॅफ्टस, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.




## देशी धंद्यास उत्तेजन द्या.

१ तांदुळाची गिरणी २ डाळीची गिरणी ३ उसाचे चरक
४ चक्क्या ५ गोल करवत (लाकडें कापण्याकरितां) ६ टूल ग्राइंडर्स
व इतर ओतीव काम तयार करणार.

**जी. जी. दांडेकर मशिन वर्क्स लिमिटेड**

भिवंडी जि. ठाणें

व्हाया-कल्याण ( जी. आय. पी. रेल्वे



पांच हॉर्स पावरचें
डिझेल एंजीन
घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.
केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें शहर.

## विविध माहिती

**साखरेचें उत्पादन**—१ नोव्हेंबर १९४९ पासून फेब्रुवारीच्या मध्यापर्यंत भारतांतील साखरेचें उत्पादन गेल्या वर्षाच्या ह्याच काळांतील उत्पादनापेक्षा ३४,७७,००० मणांनीं अधिक झालें. ह्या हंगामांत एकूण उत्पादन १,६३,७७,००० मण झालें. गेल्या हंगामांत १,२९,००,००० मण उत्पादन झालें होतें. फेब्रुवारी १५ तारखेला साखरेचा एकूण साठा १,१५,१५,००० मण होता.

**पाकिस्तानचें तुटीचें बजेट**—पाकिस्तानच्या १९५०-५१ सालच्या अंदाजपत्रकांत १·९ कोटी रुपयांची तूट दाखविण्यांत आली आहे. अंदाजपत्रकांत निम्मा खर्च लष्करासाठी दाखविण्यांत आलेला आहे. एकूण उत्पन्न ११३·६४ कोटी रुपये आणि खर्च ११५·५४ कोटी रुपये होणार आहे. तूट भरून काढण्यासाठी जादा कर बसविण्यांत येणार आहेत.

**भारत-अमेरिका व्यापार**—१९४९ सालीं भारतांत अमेरिकेकडून २५·३१ कोटी डॉलर्स किंमतीचा माल आयात झाला. उलटपक्षीं भारतानें २३·८७ कोटी डॉलर्सचा माल निर्यात केला. म्हणजे, भारतानें १·४४ कोटी डॉलर्सची आयात निर्यातीपेक्षा अधिक केली. पाकिस्ताननें १९४९ सालीं अमेरिकेकडून ४·५६ कोटी डॉलर्सचा माल आयात केला. उलट पाकिस्ताननें अमेरिकेला २·७७ कोटी डॉलर्सचा माल निर्यात केला. म्हणजे, पाकिस्तानची आयात निर्यातीपेक्षा १·७९ डॉलर्सनें अधिक झाली.

**कलकत्त्याला नवी टांकसाळ**—कलकत्त्याजवळ अलिपूर येथें एक अद्यावत् पद्धतीची टांकसाळ काढण्यांत येणार आहे. टांकसाळीच्या उभारणीला दोन कोटी रुपये खर्च येईल. ही टांकसाळ १९५० सालीं चालू होईल. दराबाद येथील टांकसाळ ता. १ एप्रिल १९५० पासून भारतीय सरकार आपल्याकडे घेणार आहे. महायुद्धाच्या वेळीं प्रसृत केलेल्या कांहीं चांदीच्या नाण्यांतील चांदी गाळण्यासाठींहि अलिपूरला एक रिफायनरी उघडण्यांत येणार आहे.

**अमेरिकेंतील हिंदी वकिलातीचा खर्च**—अमेरिकेंतील हिंदी वकिलातीमधील प्रत्येक हिंदी नौकरावर तद्देशीय युरोपिअन नौकर ठेवण्यापेक्षां तिप्पट अधिक खर्च होतो. हा अधिक खर्च होण्याचें कारण असें कीं, ह्या प्रत्येक नौकराचा कुटुंबासह हिंदुस्थानला जाण्यायेण्याचा प्रवासखर्च सरकारला करावा लागतो. तथापि ह्या खर्चामुळें भारतीय नागरिकच वकिलातीमधील कामें करतात ही महत्त्वाची बाब आहे.

**विजेच्या कारखान्यांचें राष्ट्रीयीकरण**—मद्रास प्रांतांतील विजेच्या कारखान्यांचें राष्ट्रीयीकरण ५ वर्षांत पूर्ण करण्यांत येईल, असें मंत्री श्री. भक्तवत्सलम ह्यांनीं नुकतेच जाहीर केलें. ह्या कारखान्यांच्या मालकांना नुकसान भरपाई म्हणून ३,५०,००,००० कोटी रुपये द्यावे लागतील असा अंदाज त्यांनीं केला आहे.

**नवीन भांडवल उभारणीसाठीं अर्ज**—१९४९ सालीं नवीन भांडवलाच्या उभारणीसाठीं ४८७ अर्ज आले. त्या अर्जांत मिळून ७८·४७ कोटी रुपये भांडवल उभारण्याची परवानगी मागण्यांत आली होती. १९४८ सालीं हे आंकडे अनुक्रमें ४८२ अर्ज आणि १६७ कोटी रुपये भांडवल असे होते. १९४९ सालीं आलेल्या अर्जांपैकीं २२७ अर्ज औद्योगिक कंपन्यांचे होते. त्या सर्वांचें मिळून भांडवल ४४·६६ कोटी रुपयांचें होत होतें. त्यापैकीं ५·७९ कोटी रुपये भांडवलाचे २९ अर्ज नामंजूर करण्यांत आले. बिगर औद्योगिक कंपन्यांचे १९० अर्ज आले. त्या सर्वांचें मिळून भांडवल ३०·८१ कोटी रुपयांचें होतें. त्यापैकीं ३·२ कोटी रुपयांचे ३२ अर्ज फेटाळण्यांत आले. नामंजूर झालेल्या ह्या अर्जांत बँका आणि विमा कंपन्यांचेच बरेच अर्ज होते.

**सुलभ आणि दुर्लभ चलनांचे विभाग**—परदेशीय व्यापार आणि आयातीचे परवाने ह्यांच्या दृष्टीनें भारत सरकारनें जगाचे पांच भाग पाडले आहेत:—(१) डॉलर चलनाचे देश (२) दुर्लभ चलनाचे देश (३) साधारणत: सुलभ चलनाचे देश (४) सुलभ चलनाचे देश आणि (५) द. आफ्रिका. पहिल्या गटांत, अमेरिका आणि तिच्या राज्यांतील देश, कॅनडा, न्यूफौंडलंड, फिलिफाइन्स, बोलिव्हिआ, कोलंबिआ, कॉस्टारिका, क्यूबा, डॉमिनिकन रिपब्लिक, युक्वेडोर, ग्वाटेमाला, हायटी, होंडुरास, मेक्सिको, निकाराग्वे, पनामा, सालव्हॅडोर, व्हेनेझुएला हे देश येतात. दुसऱ्या गटांत, अर्जेंटायना, बेलजम व त्याच्या वसाहती, जपान, पॅराग्वे, स्विट्झरलंड आणि प. जर्मनी ह्यांचा समावेश होतो. तिसऱ्या गटांत पोर्तुगाल आणि त्याच्या वसाहती (गोवें सोडून) ह्यांचा समावेश होतो. द. अफ्रिका सोडून इतर सर्व देश चौथ्या गटांत येतात. द. अफ्रिकेंतून माल आयात करण्यास परवाने दिले जात नाहींत.

**रुबलचा भाव वाढला**—रशिआनें आपल्या रुबलाचा भाव डॉलरच्या हुंडणावळींत वाढविला आहे. पूर्वी एका डॉलरला ५·३ रुबल्स मिळत असत ते आतां ४ च मिळतील. रशिआंतील अमेरिकन वकिलातींतील नौकरांना डॉलरला ८ रुबल्स मिळत असत ते आतां ६ च मिळतील. त्यामुळ अमेरिकन वकिलातीचा खर्च दुप्पट होईल.

**इंडोनेशिआच्या चलनाची किंमत निम्मी**—इंडोनेशिआच्या सरकारनें आपल्या चलनी नोटांची किंमत दर्शनी किंमतीच्या ५० टक्के केली आहे. ह्या नोटांच्या डाव्या बाजूच्या अर्ध्या तुकड्याबद्दल नागरिकांना दर्शनी किंमतीच्या ५० टक्के रकम देण्यांत येणार असून, उजव्या बाजूच्या अर्ध्या भागाबद्दल दर्शनी किंमतीच्या २५ टक्के इतके सरकारी कर्जाचे रोखे देण्यांत येणार आहेत. रोख्यावर ३ टक्के व्याज देण्यांत येईल. व्यवहारांत असणारें आणि बँकेंतील सर्व चलनें ह्या अवमूल्यनाच्या कक्षेंत आहे. फक्त २ ते २॥ गिल्डर्स पर्यंतची नाणीं आणि नोटा ह्यांच्या किंमती पूर्वीप्रमाणेंच रहातील.

—सर्व प्रांतांतील—
सुती—गरम—रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. २९ मार्च, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारताच्या औद्योगिक प्रगतीचा आढावा

भारत हा देश औद्योगिक भांडवल अगदी अल्प प्रमाणांत गुंतविलें जाण्याबद्दल प्रसिद्ध आहे. ब्रिटिश अमदानींत १९२३ सालीं औद्योगिक संरक्षणाचें तत्त्व स्वीकारलें जाईपर्यंत देशी उद्योगधंद्यांची वाढ भांडवलदार वर्गाच्या स्वयंस्फूर्तीनेंच कांहीं प्रमाणांत होऊं शकली. या काळांत धंदेवाईक दृष्टीनें ताग, चहा, कोळसा या धंद्यांत परदेशी भांडवल गुंतविलें गेलें. औद्योगिक विकासाचा इतिहास लक्षांत घेतला तर असें दिसतें कीं १९४६ सालापर्यंत सतत औद्योगिक प्रगति होत गेली. १९१६ सालापर्यंतची प्रगति अगदी मंदगतीनें होत गेली. १९१६ पासून दोन वर्षें पहिल्या महायुद्धाच्या काळांत जरा वेगानें प्रगति झाली. १९२९ पर्यंत बेताची प्रगति होत राहिली, परंतु १९२९ सालीं मंदीचा किंचित् परिणाम झालेला आढळतो. १९३१ नंतरच्या १५ वर्षांत प्रगति वेगानें झालेली दिसून येते. १९४६ सालीं प्रगतीऐवजीं उत्पादन कमी झालें. ही स्थिति दोन वर्षें राहून १९४८ पासून पुन्हा औद्योगिक प्रगति दिसून येते.

औद्योगिक प्रगति होतांना लोकांच्या राष्ट्रीय वृत्तीचा व बदलणाऱ्या जागतिक परिस्थितीचा अनुकूल परिणाम धंद्यांच्या वाढीवर झालेला दिसून येतो. १९०० सालापर्यंत कापड, ताग, कोळसा हेच मुख्य धंदे होते. कागद व पोलाद हे धंदे नंतर सुरू झाले. पुढें १९२५ नंतरच्या काळांत काड्याच्या पेट्या, सिमेंट व साखर हे धंदे अस्तित्वांत आले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत मशिन टूल्स, ॲल्युमिनियम, रासायनिक धंदे व सायकल्स यांची वाढ झाली. या व्यतिरिक्त १९२० नंतरच्या काळांत साबण, कॉस्मेटिक्स, कांच याहि धंद्यांची वाढ झाली. मोटारी व रेल्वे इंजिनें बांधणें हे अगदी नवीन धंदे आहेत. भारताच्या सरासरी दर माणशीं वार्षिक उत्पन्नाचे दादाभाई नौरोजी यांच्या वेळेपासून जे निरनिराळे आंकडे उपलब्ध आहेत त्यांवरून असें एक अनुमान निघतें कीं, विशेषतः पहिल्या महायुद्धानंतरच्या काळांत उत्पन्नाचें मान निश्चित वाढलें आहे. डॉ. राव यांनीं अंदाज केलेल्या दर माणशीं वार्षिक उत्पन्नाच्या आंकड्यांत कांहीं विशेष भर पडली नसावी. औद्योगिक वाढीचा विचार करतांना नुसत्या उत्पन्नाच्या आंकड्यावर लक्ष ठेवून चालत नाहीं, तर दर दहा वर्षांत लोकसंख्येची होणारी वाढहि लक्षांत घ्यावी लागते. भारतामध्यें लोकसंख्येची वाढ झपाट्यानें होत असल्यामुळें औद्योगिक प्रगतीचा दृश्य फायदा प्रत्येकाच्या वाट्यास विशेष प्रमाणांत आल्याचें दिसत नाहीं. याचा दुसऱ्या शब्दांत अर्थ असा कीं, उद्योगधंद्यांच्या वाढीच्या प्रमाणांत सर्वसाधारण जनतेच्या क्रयशक्तींत वाढ झालेली नाहीं. या पुढें भारताची औद्योगिक वाढ समाधानकारक होण्यासाठीं भांडवल संचय व भांडवल गुंतविलें जाणें, मजुरांची कार्यक्षमता, उत्पादनाचा कमी खर्च, उत्पादनाच्या पद्धतींत सुधारणा, कांहीं धंद्यांच्या बाबतींत कच्च्या मालाचा भरपूर पुरवठा व यंत्रज्ञ लोक इ. गोष्टींची आवश्यकता आहे.

---

## भारतीय धनिक आणि शास्त्रीय संशोधन

पुणें येथें नुकत्याच होऊन गेलेल्या भारतीय शास्त्रज्ञांच्या परिषदेस प्रो. बर्नाल हे ब्रिटिश शास्त्रज्ञ आले होते. ते हिंदुस्थानांत दौऱ्यावर असतां त्यांनीं शास्त्रीय संशोधन आणि औद्योगिक विकास ह्या विषयासंबंधीं आपले विचार वेळोवेळीं प्रगट केलेलेच आहेत. आतां प्रो. बर्नाल आपल्या मायभूमीला परत गेले असून त्यांनीं लंडन येथील पत्रकारांना एक मुलाखत दिली. भारताच्या औद्योगिक विकासाबद्दल त्यांनीं व्यक्त केलेले विचार मननीय आहेत.

प्रो. बर्नाल ह्यांच्या म्हणण्याचा आशय असा कीं, भारतांतील मध्यवर्ती आणि प्रांतिक सरकारें शास्त्रीय आणि औद्योगिक संशोधनावर जोराचा भर देत आहेत. परंतु संशोधनाला लागणारी साधनें भारताजवळ नाहींत. शास्त्रीय व औद्योगिक संशोधनाच्या मार्गांत येवढाच अडथळा आहे, असें मात्र नाहीं. स्थानिक परिस्थिति आणि स्थानिक साधनें ह्यांचा विचार न करता युरोपियन पद्धतीनें संशोधन करण्यांत येत आहे. प्रो. बर्नाल ह्यांच्या मतें हें इष्ट नव्हे. भारतांतील उद्योगपती संशोधनाला उत्तेजन देण्याइतके श्रीमंत नाहींत, किंवा दूरगामी व भविष्यकाळीं फलदायी होण्याच्या संशोधनाच्या योजना त्यांना पसंत तरी पडत नाहींत. त्यांची दृष्टी तावडतोब श्रीमंत कसें होतां येईल, इतक्यापुरतीच मर्यादित असते. युरोपिअन कारखानदारांकडून पेटंट्स आणि औद्योगिक पद्धती घेऊन, त्यांच्याबद्दल त्यांना रॉयल्टी देणें एवढ्यावरच भारतीय भांडवलदार खुष असतात.

भारतांतील भांडवलदारांच्या ह्या वृत्तीला अपवाद म्हणजे टाटांचे उद्योगधंदे होत, ही गोष्ट प्रो. बर्नाल ह्यांनीं मोकळ्या मनानें मान्य केली आहे. तथापि सर्वसाधारण भांडवलदार वर्गासंबंधानें बोलताना त्यांनीं असें म्हटलें आहे कीं, बहुतेक भांडवलदार राष्ट्रीय विकासाच्या दृष्टीनें औद्योगिक विकास घडवून आणण्याविषयीं बेपर्वा असतात किंवा त्यांच्या जवळ पुरेशी साधनें नसतात. प्रो. बर्नाल ह्यांनीं हिंदुस्थानांतील शास्त्रीय संशोधनाविषयीं व्यक्त केलेले हे विचार महत्त्वाचे आहेत. विशेषतः स्थानिक परिस्थिती आणि साधनें ह्यांचा योग्य वापर करण्यासंबंधीं त्यांनीं दिलेली सूचना व्यवहारांत आणणें फार अगत्याचें आहे.

---

**बँक बंद न करण्याचा हुकूम**—कलकत्ता नॅशनल बँकेची आग्रा येथील शाखा बंद करूं नये असा हुकूम त्या शाखेच्या मॅनेजरवर आग्रा येथील सिव्हिल कोर्टानें बजावला आहे. शाखेच्या नोकरांना कामावरून कमी करून बँक बंद करण्याचें ठरविण्यांत आल्यामुळें बँकेच्या नोकरांनीं कोर्टांत दावा लावला होता. नोकरांच्या म्हणण्याप्रमाणें अशा तऱ्हेनें बँक बंद करणें म्हणजे इंडस्ट्रिअल डिस्प्यूट्स ॲक्टच्या कलम ३३ आणि २३ ह्यांचा भंग करणेंच होय.

**टोल टॅक्स रद्द**—पंजाब सरकारनें आपल्या राज्यांत म्युनिसिपल टोल टॅक्स रद्द केला आहे असें समजतें.

### दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

वरील बँकेचे एकंदर व्यवहार वाढते व समाधानकारक आहेत. खर्चाचें प्रमाण वाढलें असूनहि बँकेचें उत्पन्न थोडेसें वाढलें आहे. अहवालाच्या वर्षी बँकेच्या गिरगांव शाखेंत रोकड व तारण गहाणाचे सोन्याचे जिन्नस चोरीस गेल्यामुळें बँकेस ८९,५७१ रुपयांचें नुकसान झालें. बँकेच्या नित्याच्या व्यवहारांतून जें निव्वळ उत्पन्न शिल्लक रहातें त्यांतूनच हें नुकसान भरून काढण्याचें व रिझर्व्ह आणि इतर फंडास हात न लावण्याचें बोर्डाचें धोरण अत्यंत योग्य असेंच आहे. त्यामुळें भागीदारांना आतां डिव्हिडंड मिळालें नाहीं तरी जून अखेर इंटेरिम डिव्हिडंड मिळूं शकेल. एवढें मोठें नुकसान एका वर्षाच्या चालू उत्पन्नांतून ही बँक भरून काढूं शकली, ह्यावरून तिची मजबुती व तिचा किफायतशीरपणा ह्यांची कल्पना येईल. ताळेबंदांतील प्रमुख आकडे खालीं दिले आहेत.

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ५,००,००० | कॅश | ७,५५,१९० |
| फंड | १५११,००० | इनव्हेस्टमेंटस | ४०,३० ३६७ |
| ठेवी | ६७,३६,००० | कर्जे | २६,६१,६५२ |
| ओव्हरड्राफ्ट | २,४४,५५४ | नफातोटा खातें | ५१३ |

बँकेची मुख्य कचेरी १५१, भवानी पेठ, सातारा येथें असून बँकेच्या मुंबई येथें दोन व पुणें, नाशिक व बार्शी येथें शाखा आहेत. ( चेअरमन: विमामहर्षि श्री. वा. ग. चिरमुले. मॅनेजर: श्री. सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम. सेक्रेटरी: श्री. रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. )

### बँक ऑफ पूना लि.

वरील शेडयूल्ड बँकेच्या ताळेबंदांतील प्रमुख आकडे खालील-प्रमाणें आहेत:—

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | १२,५०,००० | कॅश | ७,९१,६२४ |
| ठेवी | १९,५०,१४८ | इनव्हेस्टमेंट | ८,५६,६०२ |
| नफा | १६,४८६ | कर्जे | १५,६८,२५४ |


बँकेचा एकूण ताळेबंद ३२ लक्ष, ४४ हजारांचा आहे. १९४९ मध्यें बँकेनें १,४०,४४१ रु. उत्पन्नांतून व्याज, पगार, व्यवस्था-खर्च, १९४८ अखेरपर्यंत इनकमटॅक्स, इत्यादि भागवून १६,४१४ रु. नफा मिळविला. ४,५०० रु. रिझर्व्ह फंड, ५,५०० रु. इनकम-टॅक्स तरतूद, २,००० रु. प्राथमिक खर्च, असे नफावाटणीचे प्रमुख आकडे आहेत. बँकांच्या ठेवींचे आकडे सामान्यतः कमी झाले तरी बँक ऑफ पूना जवळील ठेवींत वाढच होत आहे आणि बँकेची प्रगति सतत चालू आहे. अहवालाचे वर्षी डायरेक्टरांनी व लोकल कमिटीच्या सभासदांनी मुळीच फी न घेता काम केलें आहे, ही नमूद करण्याजोगी गोष्ट आहे. बँकेच्या पुणें शहरांत दोन शाखा असून सोलापूर व सांगली येथें प्रत्येकीं एक शाखा आहे. बँकेची वार्षिक सभा १५ एप्रिल, १९५० रोजीं होणार आहे. ( चेअरमन: सेठ मुरलीधर चतुर्भुज लोया. व्हाइस चेअरमन : सेठ डी. आर. नाईक, जे. पी. मॅनेजर: श्री. गो. गं. साठे, ए. बी. आय. [ लंडन ] )

### विमा कायदा दुरुस्ती

#### विलायतील सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट

सिलेक्ट कमिटीनें बिलांतील ६९ पैकीं १७ कलमांत दुरुस्ती सुचविली आहे. तिच्या सूचनांपैकीं कांहीं येथें दिल्या आहेत. ज्या कंपन्यांचे शेअर्स अनेक प्रकारचे आहेत, त्यांनीं तीन वर्षांत ह्या शेअर्सचें रूपांतर एकाच प्रकारच्या शेअर्समध्यें केलें पाहिजे. प्रत्येक स्पेशल एजंटाचे किमान २ तरी विमा एजंट पाहिजेत. चीफ एजंटाचे ६ तरी विमा एजंट पाहिजेत. मोठ्या कंपन्यांत ते १२ तरी पाहिजेत. स्पेशल एजंट ५०,००० रुपयां-पर्यंत वैयक्तिक काम करूं शकेल. मूल्यमापनांतील वाढाव्यापैकीं १०% भागीदारांस मिळण्याची मूळ योजना होती. सिलेक्ट कमिटीनें हा वाटा ७½% केला आहे. एजंटानें राजीनामा दिला तरी त्याला रिन्युअल कमिशन मिळालें पाहिजे. मात्र त्यानें विमा कंपनीचें ५ वर्षे तरी सतत काम करून त्याच्या मार्फतीचें किमान ५०,००० रुपयांचें विमा काम चालू पाहिजे. रिन्युअल कमिशनचा कमाल दर ४% राहील. एजंटाच्या मृत्यूनंतर त्याच्या वारसांसहि कमिशन मिळत राहिलें पाहिजे.



## इनकमटॅक्सच्या आकारणींतील अन्याय

लेखकः—श्री. ज. वि. दातार, हरकामी ठेकेदार, पुणें, ४

देशांतील कायदे मानणें हा नागरिक लोकांचा धर्म मानण्यांत यावा या बाबत दुमत नाहीं. परंतु त्याचबरोबर कायदे करणें व ते पाळावयास लावणें यांचें समिकरण देशांतील लोकांना कितपत पचतें, त्यांना त्याचें किती ज्ञान आहे, त्यांची तें जाणण्याची पात्रता किती आहे व सरकारची मशिनरी कायदा पाळावयास लावणारी कोणत्या साचाची आहे, ते जनतेची सेवा करून त्यांना योग्य तें मार्गदर्शन करते किंवा नाहीं यांचें प्रात्यक्षिक आपण निवडून दिलेल्या आपल्या पुढाऱ्यांनीं पहावयास पाहिजे. नाहींतर अगोदरच त्रासलेल्या जनतेचा पुढाऱ्यांच्या वरचा विश्वास उडाल्यावर त्या गरीब जनतेची काय स्थिती होईल तें एक तो परमेश्वर जाणें. असो.

सरकारनें प्राप्तीकर कायदा करून त्याचें पालन करण्याकरतां जी पद्धत चालून दिली आहे तिच्या बाबत मी एक हारपळलेला नागरिक या नात्यानें स्पष्ट म्हणूं इच्छितों कीं, प्राप्तीकर आकारणी पद्धत अगदी गैर हिशोबी व अडाणी पद्धतीची अशी आहे.

पूर्वी आमचे हिशोब एक्झॅमिनर म्हणून एकजण संपूर्णतः तपासत असे व मग त्याच्या नोट्स काढून इनकमटॅक्स ऑफिसर यांचेकडे पाठवीत असे. त्याची खात्री झाली तर एक्झॅमिनरच्या आकारणीस मान्यता मिळे व कर आकारणी होई. अर्थात् या पद्धतीनें जाऊन लोकांना न्याय्य अशी आकारणी होत आहे किंवा नाहीं हा वादाचा प्रश्न बाजूला सोडला तरी एक्झॅमिनर हिशोबाची तपासणी व छाननी खासच तपशिलवार करत असे हें निर्विवाद. आतां ती पद्धत आपल्या सुविधांनीं बदलून काम वाढीबरोबर त्या सर्व तपासणीदारांना ऑफिसर केलें असून त्यांनींच हिशोब तपासून त्यांनींच कर आकारणी करावयाची व आकारणी पसंत नसल्यास जनतेनें त्यावर अपील करावें. मात्र आकारणी केलेली रकम प्रथम भरली पाहिजे. अपील ऐकणारे त्याच इनकमटॅक्स खात्यांतील वरच्या दर्जेचे वरिष्ठ अमलदार असतात. सरकार म्हणेल ठीक आहे, जर कोणास योग्य असा न्याय मिळाला नसेल त्यांनीं लवाद कोर्टाकडे (ट्रायब्यूनल) दाद मागावी व त्याहूनहि त्यांना अन्याय झाला असेल तर वरिष्ट कोर्ट (हायकोर्ट) आहेच व त्याचेवरही आतां सुप्रीम कोर्ट आहेच. अर्थात् ज्या रोग्याजवळ राजयक्ष्मावर इलाज करण्यास भरपूर द्रव्यसहाय असेल तो त्या रोगावर इलाजाकरतां खर्च करतोच व त्यांतूनही योग्य न्याय न मिळाल्यास आणखी अपील करण्यास स्वर्गांत जाऊन फिर्याद गुदरतोच. तद्वतच जे कोणी प्राप्तीकर भरतात त्यांना पैसे मिळविण्याचा रोग झालेला असतो व एकदां का त्याला हा राजयक्ष्माचा विकार झाला कीं त्याचें निराकरण म्हणजे एक दिव्यच होय.

मनुष्यमात्र लबाड असतो या भूमिकेवरून कर भरणी व आकारणी यांची इमारत आजपर्यंत रचली गेली आहे. परंतु आतां आपल्या स्वराज्य-प्राप्तीनंतर आपणच आपलें राज्य चालवतों या उदात्त व मुख्य भूमिकेवरून आपण व आपल्या कायदा करणाऱ्यांनीं व कायदे पाळन करणारे या सर्वांनीं आपली भूमिका व त्याची दिशा ठरवावयास पाहिजे.

विषयांतर झालें. मुख्य मुद्दा असा कीं, सध्यां प्राप्ती कर आकारणी कशी केली जाते याची छाननी व्हावयास पाहिजे. वास्तविक या ऑफिसमध्यें हिशोब तपासणें हें मुख्य काम असतांना कराचे उत्पन्नावर जरा दृष्टी टाकली तर माझें म्हणणें काय आहे याचा उलगडा होईल. प्रत्येक खातेदाराचे हिशेब कसे व किती तपशीलानें तपासले जातात व त्याला किती वेळ लागतो याचें कोष्टक मांडल्यास माझ्या प्रश्नाचें उत्तर आपोआपच मिळेल. नुसते आढाव्यावरून वर वर पाहून कांहीं तपशील मागून निदान कंत्राटदारांची टक्क्यांवर आकारणी होत असते. त्यामुळेंच ठेकेदारांना त्यांच्यापुढें एक प्रश्न पडला आहे कीं यापुढें आपला टिकाव व निभाव कसा लागणार ? या दिव्यांतून मुक्ती मिळावी म्हणून या करदेवीच्या देवळांत जाण्यापूर्वी आतां बहुतेक प्रत्येकास आपल्या अडाणीपणाचें प्रदर्शन करण्याकरतां मंढईतल्या दलालाप्रमाणें प्राप्तीकर—कायदा—पंडितांच्या तर्फे जावें लागते व त्यांचा दक्षणाकर भरणा केल्यावर मगच करदेवीकडे जाऊन दर्शनाचा लाभ होतो. तो एक स्वतंत्रच विषय आहे !

---

## दि बँक ऑफ औंध लि.

### श्री. वर्तक, सेवानिवृत्त मॅनेजिंग डायरेक्टर, यांचा सत्कार

दि बँक ऑफ औंध लि. चे डायरेक्टर श्री. बाळकृष्ण रामचंद्र वर्तक हे बँकेच्या स्थापनेपासून १७ वर्षांच्या प्रदीर्घ कालानंतर तारीख १-१-१९५० पासून बँकेच्या नोकरींतून सेवानिवृत्त झाले. त्याबाबत बँकेचें बोर्ड ऑफ डायरेक्टर्स व स्टाफ यांचे तर्फे तारीख ५-३-१९५० रोजीं बँकेचे चेअरमन श्री. नरहर गंगाधर उर्फ नानासाहेब जोशी यांचे अध्यक्षतेखाली बँकेचें सातारा येथील ऑफिसांत सत्कार समारंभ करण्यांत आला. सदर प्रसंगीं प्रथमतः बँकेचे मॅनेजर श्री. घमंडे यांनीं प्रास्ताविक भाषण करून सन्मान्य पाहुणे श्री. बाबासाहेब वर्तक यांचा परिचय करून दिला. अध्यक्ष श्री. जोशी, दिवाण बहादूर मुथा, श्री. मामासाहेब चांदोरकर, श्री. बाळासाहेब पटवर्धन, श्री. मनोहरपंत भागवत, डॉ. गोपाळराव केळकर, व स्टाफ तर्फे श्री. कानडे, एजंट शाखा आटपाडी, यांनीं श्री. बाबासाहेब वर्तक यांच्या अत्यंत कुशळ कामगिरीबद्दल व त्यांच्या प्रेमळ स्वभावाबद्दल गौरवपर भाषणें केलीं. उत्तरादाखल श्री. वर्तक यांनीं त्यांना जें यश मिळालें त्याचें सर्व श्रेय त्यांचे वडील, हल्लींचे अर्थमंत्री श्री. ना. वैकुंठराय मेथा, वामनराव पुंडलीक वर्दे व उद्योग पती श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर यांना आहे असें सांगितलें. या प्रत्येकाच्या पासून दीर्घोद्योग, नेकी, प्रामाणिकपणा, तत्त्वनिष्ठा, सहानुभूति, अनुभव वगैरे जीवनांतील यशस्वी घटकांचा लाभ झाला व त्यामुळें आपणांस थोडेंबहुत यश प्राप्त झालें याबद्दल त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानले. तसेंच यापुढेंही बँकेस त्यांनीं सल्ला, मार्गदर्शन वगैरे देण्याबाबत आश्वासन दिलें.



श्री. वर्तक

---

**भारताचीं नवीं नाणीं**—ता. १५ आगस्ट रोजीं भारतीय स्वातंत्र्याचा तिसरा वाढदिवस येतो. त्या दिवशीं नवीन नाणीं वापरण्यास प्रारंभ होणार आहे. नाण्यांच्या एका बाजूला अशोक स्तंभ आणि दुसऱ्या बाजूला धान्याचीं कणसें अगर अशोकाच्या नंदीची प्रतिमा असेल.

## भारत इंडस्ट्रिअल बँक लि.ची प्रगति

**अध्यक्ष श्री. बी. बी. वाळवेकर, ह्यांचें बँकेच्या वार्षिक सभेंतील भाषण**

बँकेच्या प्रगतीची कल्पना स्पष्टपणें यावी म्हणून कांहीं तुलनात्मक आंकडे सन १९४८ अखेरचे व सन १९४९ अखेरचे असें आपले माहितीसाठीं सांगत आहे.

ठेवी (रु.)

| | १९४८ | १९४९ |
|---|---|---|
| चालू | १७,६२,१८२ | १८,८७,७४५ |
| सेव्हिंग्ज | १५,०७,३६४ | १५,४१,५१२ |
| कायम | १६,०३,६३० | १६,९९,४१७ |
| एकूण | ४८,७३,१७७ | ५१,२८,६७५ |

कर्जे (रु.)

| | १९४८ | १९४९ |
|---|---|---|
| बिल्स डिस्कौंटेड. | २,२०,०३९ | ३,६७,९३२ |
| तारणावरील कर्जें. | ११,२६,२८८ | १३,३८,१८३ |
| हातावरील कर्जें | १०,४०,५०९ | ९,१७,०२८ |
| एकूण | २३,८६,८३७ | २६,२३,१४४ |

वरील आंकड्यांवरून चालू वर्षी ठेवीमध्यें रु. २,५५,४९७–इतकी वाढ झाली असून दिलेल्या कर्जामध्यें गेल्या वर्षी दिलेली हातावरील कर्जें कमी करून रुपये २,३६,३०६–१५ ६ इतकी वाढ झाली आहे. कर्जें देतांना शक्यतों तारणावरील कर्जें देण्याचें धोरण आहे व त्याचा दृश्य परिणाम म्हणजे चालू वर्षी तारणावरील कर्जें रु. १३,३८,१८३–५–२ व हातावरील कर्जें रु. ९,१७,०२८–६–४ इतकीं आहेत. हेंच प्रमाण गतवर्षी म्हणजे १९४८ अखेर तारणावरील कर्जें रु. ११,२६,२८८ व हातावरील कर्जें रु. १०,४०,५४९ असें होतें. १९४८ अखेर सरकारी कर्जरोख्यामधील गुंतवणूक रु. १७,७३,७०२ होती. त्यांत चालू सालीं २॥ लाखांची वाढ होऊन ती रुपये २०,१८,३१२ इतकी झाली आहे.

शेड्यूल्ड बँकांचे व्यवहाराचे जे आकडे उपलब्ध झाले आहेत, त्यावरून बँन्कांकडे असलेल्या ठेवी कमी होत आहेत असें दिसत आहे. तथापि आपल्या बँन्केचे अहवालाचे सालीं ठेवींची वाढ सुमारें २॥ लाखांचे वर झालेली आहे. बँन्केचा पैसा तरता रहावा या दृष्टीनेंच कर्ज गुंतविणेचें धोरण ठेविलें असून लिक्विड रिसोर्सेसही शक्यतों जास्त प्रमाणांत ठेवण्याची दक्षता घेतलेली आहे. वरील सर्व विवेचनावरून अहवालाचे सालीं बँन्केची निश्चितपणें प्रगति झालेली आहे ह आपल्या लक्षांत येईलच.

मध्यवर्ती सरकारचें यंदाचें बजेट पहातां तें मांडताना अर्थमंत्र्यांनीं केलेले भाषणावरून भारताचे आर्थिक परिस्थितीचा पाया सुधारण्याचे मार्गावर आहे असें दिसून येईल. उत्पादन वाढ आणखीही ज्यास्त प्रमाणांत व्हावी या दृष्टीनें नवीन कर बसविण्यांत आलेले नसून उलट कंपन्यांचे बाबतींत इन्कमटॅक्सचा थोडासा रिलिफही दिला आहे. तसेंच नफा वाटणीवरील असलेलें बंधनही काढल्यामुळेंच कारखान्यांना लागणारें भांडवल (जरूर तें) मिळेल असा कयास आहे. एकंदरीनें चालू सालीं देशांतील औद्योगिक वाढ समाधानकारक होऊन बँन्कांचे व्यवहारावर इष्ट असाच परिणाम होईल असा भरंवसा वाटतो.

बँन्केनें १९४६ सालीं लक्ष्मी रोडवर बँन्केकरिता जागा घेतलेली आहे, याची आपणास माहिति आहेच. आज त्या जागेची किंमत १। लाखांचे वर होण्याजोगी आहे. म्हणजे घेतलेल्या किंमतीपेक्षां आज बाजार भावानें सुमारें ५० हजाराची वाढ सदरहू जागेच्या किंमतींत झालेली आहे. अहवालांत लिहिल्याप्रमाणें या जागेवर लौकरच इमारत बांधण्याचे कामास सुरुवात होईल. बँन्केचें इमारतीचें मॉडेल आपणा सर्वांस पहाण्यासाठीं मुद्दाम येथें ठेविलें आहे. त्यावरून सदर इमारत कशी होईल याची आपणांस निश्चित कल्पना येईल.

चालू सालीं रिपोर्टांत लिहिल्याप्रमाणें सासवड माळी शुगर फॅक्टरीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. हरिभाऊ बळवंत गिरमे यांना बोर्ड ऑफ डायरेक्टर्सवर कोऑप्ट करून घेतलें आहे. या योगानें आपल्या बँन्केनें प्रथितयश अशा साखर कारखान्याशीं निगडीत संबंध जोडलेले आहेत. श्री. गिरमे यांचेमुळें बँन्केचें कार्यास महत्त्वाचा हातभार लागेल असा भरंवसा आहे.

बँन्केच्या झालेल्या या प्रगतीस शाखांची लोकल ॲडव्हायसरी बोर्डस यांचें बहुमोल सहाय्य झालें आहे. तसेंच बँन्केचे उभयता मॅनेजिंग डायरेक्टर्स यांनीं बँन्केच्या कार्याची धुरा आतांपर्यंत यशस्वी रीतीनें वाहून बँन्केचें पाऊल प्रगतिपथावर ठेविलें आहे. हे त्यांचेप्रमाणें आम्हां सर्वांनाही भूषणावह आहे. तसेंच त्यांचें देखरेखीखालीं असलेला अधिकारीवर्गही आपापलीं कामें दक्षतेनें व जबाबदारीनें पहात आहे.


## दि न्यू सिटिझन बँक

### ऑफ इंडिया, लि.

**हेड ऑफिस : १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई**

एकूण खेळतें भांडवल : ३,६०,००,००० रु. वर
वसूल भांडवल, रिझर्व्ह व इतर फंड : १२,००,०००रु वर

★ बँक स्ट्रीटवर ★

**३,१७,००० रुपयांची बँकेची स्वतःची इमारत**

स्थानिक शाखा : १ दादर, २ गिरगांव, ३ ग्रँटरोड, ४ जव्हेरी बाजार, ५ माटुंगा, ६ शीव, ७ विलेपार्ले.

इतर शाखा : ८ अहमदाबाद, ९ अहमदनगर, १० अकोला, ११ अमरावती, १२ बडनेरा, १३ बेळगांव, १४ चांदा, १५ कडाकटाऊन (सी. पी.), १६ दिल्ली, १७ देवळाली, १८ धुळें, १९ गुरगांव (पंजाब), २० इचलकरंजी, २१ जळगांव, २२ कारंजा, २३ कोल्हापूर, २४ कोपरगांव, २५ लोणंद, २६ महाड, २७ मालेगांव, २८ मिरज, २९ मूर्तिजापूर, ३० नागपूर शहर, ३१ नंदुरबार, ३२ नाशिक शहर, ३३ नाशिक रोड, ३४ पंढरपूर, ३५ पहाडगंज, ३६ पेण, ३७ पुणें शहर, ३८ पिंपळगांव, ३९ संगमनेर, ४० सांगली, ४१ शाहुपुरी, ४२ सिन्नर, ४३ सिताबर्डी, ४४ यवतमाळ, ४५ शिवाजी नगर (पुणें), ४६ शहापूर (बेळगांव), ४७ नामपूर (नाशिक).

**—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—**

भागीदारांची संख्या २,२०० वर. ठेवीदारांची संख्या ५०,००० वर.

**डी. एन. गांडेकर,**
बी. ए., एलएल. बी.,
मॅनेजर, पुणें शाखा.
(बुधवार चौक)

**डी. डी. देशपांडे, बी. ए.**
मॅनेजिंग डायरेक्टर.

## ईस्टर्न एकॉनॉमिस्टचें १९४९ च्या हिंदच्या आर्थिक परिस्थितीबद्दल संशोधन

( भा. म. काळे. )

दिल्लीच्या ईस्टर्न एकॉनॉमिस्टनें दर वर्षाप्रमाणें डिसेंबरअखेर विशेष स्वरूपाचा वार्षिक अंक काढला आहे. यंदांच्या अंकांत गेल्या ५० वर्षांतील आर्थिक व औद्योगिक प्रगतीची विस्तृत माहिती दिली आहे, व नंतर 'राष्ट्राचें अंदाजपत्रक' या सदराखालीं गेल्या वर्षाची विशेष संशोधनानें तयार केलेली माहिती 'सोशल अकाउंटिंगच्या' पद्धतीनें देण्यांत आली आहे. अनेक प्रकारचे उद्बोधक आलेख दिलेले आहेत. ईस्टर्न एकॉनॉमिस्टच्या संशोधनावरून दिसून आलेल्या कांहीं गोष्टी सारांशरूपानें पुढें दिल्या आहेत.

गेल्या दहा वर्षांत हिंदी जनतेचें जीवनाचें मान आहे त्याच पातळीवर साधारण स्थिर आहे व किंचित् तें कमीहि झालें आहे. पैशाच्या रूपांत राहाणीचें मान पुष्कळच वाढलें असलें तरी प्रत्यक्ष वस्तूंच्या रूपांत तें वाढलेलें नाहीं. हिंदुस्थानच्या सर्व प्रांतांचें १९३९–४० सालीं राष्ट्रीय उत्पन्न रु. १९३४ कोटी होतें, तर १९४८–४९ सालीं हिंदच्याच प्रांतांचें हें उत्पन्न रु. ४४६० कोटी झालें. म्हणजे वार्षिक सरासरी दर माणशीं उत्पन्न १९३९–४० मध्यें रु. ६७ होतें ते १९४८–४९ सालीं रु. १८६ झालें. शेतीचें उत्पन्न हळू हळू वाढत चाललें आहे याचें गमक म्हणजे १९३९–४० सालीं शेतीचें उत्पन्न राष्ट्रीय उत्पन्नाच्या ४९·२ टक्के होतें तें १९४६–४७ सालीं ५७·३ टक्के झालें. म्हणजे सात वर्षांत शेतीच्या उत्पन्नांत एकंदर वाढ रु. ३६० कोटी झाली. १९४८–४९ ची शेतीच्या उत्पन्नाची वाढ रु. २३० होती. याचें कारण १९४६–४७ सालीं शेतीचें उत्पन्न चांगलें आलें होतें. गेल्या दहा वर्षांत शेतीचें उत्पादन समाधानकारक होतें. त्याच वर्षी राहाणीचें मान १९४० प्रमाणें टिकूं शकलें. परंतु इतर वर्षी तें कमीच झालें असावें असा अंदाज आहे. गेल्या दहा वर्षांत देशांतील भांडवलाच्या परिस्थितीवर अनिष्ट परिणाम झाला आहे. याचीं मुख्य कारणें म्हणजे निरनिराळ्या वस्तूंचे वाढत जाणारे बाजारभाव व समाजांतील राष्ट्रीय संपत्तीचा ओघ शिल्लक टाकणाऱ्या वर्गापासून सामान्यपणें शिल्लक न टाकणाऱ्या वर्गाकडे वळला आहे. त्यामुळें विशेषतः गेलीं दोन वर्षे भांडवलाला ओहोटी लागली आहे. समाजाचें आर्थिक जीवन योग्य प्रमाणांत भांडवलाचा पुरवठा होण्यावरच अवलंबून असतें. गेल्या वर्षी हिंदचें आर्थिक जीवन आपल्या उत्पादनाच्या परिस्थितीला पेलणार नाहीं अशा स्वरूपाचें झालें.

१९४६ पासून १९४९ पर्यंत हीं वर्षे पावसाच्या दृष्टीनें समाधानकारक न गेल्यामुळें धान्याचें उत्पादन घटलें. १९४२, १९४५, १९४८ व १९४९ ह्या चार सालीं हिंदमध्यें धान्याचें उत्पादन अनुक्रमें ४६, ५१, ४७ व ४३ दशलक्ष टन ह्या प्रमाणें झालें. सर्वसाधारण अन्नधान्याच्या किंमतीचा निदर्शक आंकडा अलिकडे ४०५·१ आहे; एका वर्षांत ह्या आंकड्यांत ११ नीं वाढ झाली.

कापडाची परिस्थिति कांहींशी सुधारत आहे. १९४८–४९ सालीं गिरण्यांतील कापडाचें उत्पादन ४२४ कोटी वार झालें. हातमागावर १४० कोटी वार कापड तयार झालें व आयात ४ कोटी, ७० लक्ष वार इतकी झाली. दर माणशीं सरासरी वार्षिक कापड १६·६ वार इतकें मिळूं शकलें. १९४० सालीं ह्या आंकडा १६·६७ वार इतका होता, परंतु मध्यंतरीं १९४३ सालीं १२ वार, १९४६ सालीं १४ वार व १९४७ सालीं १२·२ वार इतका झाला होता. कापडाच्या उत्पादनाची परिस्थिति सुधारत असली तरी फाळणीमुळें दर वर्षी कमींत कमी १० लक्ष गांठी कापूस आयात करणें आवश्यक झालें आहे. परराष्ट्रीय व्यापारांत गेलीं तीन वर्षे सतत येणाऱ्या प्रतिकूल तफावतीमुळें कापसाची आयात करणें कठीण झालें आहे. अंतर्गत खप व निर्गत या दृष्टीनें चांगल्या प्रकारचेंच कापड विणणें आवश्यक झालें आहे, व यासाठीं लांब धाग्याच्या चांगल्या अमेरिकन कापसाची आयात करणें आवश्यक आहे.

देशांतील जनतेच्या रहाणीचा दर्जा हा संपत्तीचें एकंदर वार्षिक उत्पादन, रहाणीचा खर्च व परराष्ट्रीय व्यापारांतील निव्वळ तफावत या तीनहि गोष्टींवर समुच्चयानें अवलंबून असतो. गेल्या दहा वर्षांत हिंदी जनतेचें रहाणीचें मान खालावत चाललें आहे हें निश्चित. देशांतील सर्व जनतेच्या रहाणीच्या खर्चाचा निदर्शक आंकडा १९४० सालीं १०० समजला तर तो १९४३ सालीं १४६, १९४६ सालीं २५३, व १९४८ सालीं २९२ याप्रमाणें झाला. परंतु दर मनुष्याची खरी वार्षिक प्राप्ति (जनरल इंडेक्स-प्रमाणें) १९४० सालीं २८७·५, १९४३ सालीं १९१, १९४६ सालीं २३५·५ व १९४८ सालीं २५२·८ या प्रमाणें होती. म्हणजे १९४० ची स्थिति केव्हांहि ज्यास्त समाधानकारक होती. ज्यांच्या मालकीची शेतजमीन दहा एकरापेक्षां ज्यास्त आहे अशा शेत–मालकांची परिस्थिति धान्याचे बाजारभाव विशेष वाढल्यामुळें सुधारली यांत संशय नाहीं. या वर्गानें जुनीं कर्जे फेडलीं, व या वर्गाचें राहाणीचें मानहि वाढलें. या वर्गानें थोडीशी शिल्लकहि टाकली आहे. परंतु विशेषतः मध्यम वर्गाची स्थिति गेल्या सात–आठ वर्षांत विशेष खालावली. आर्थिक जीवनाला आवश्यक असें भांडवल पूर्वीप्रमाणें उद्योगधंद्यांत गुंतविलें जात नाहीं.

१९४८–४९ सालीं सर्व प्रांतांतील वैयक्तिक उत्पन्न रु. ४३८८ कोटी झालें, व वैयक्तिक शिल्लक रु. ८२ कोटी होती. म्हणजे उत्पन्नाच्या फक्त अर्धा टक्का इतकीच शिल्लक पडली. आर्थिक जीवनाच्या दृष्टीनें हें प्रमाण अगदीं असमाधानकारक आहे.

हिंदचें १९४८–४९ सालीं एकंदर राष्ट्रीय उत्पन्न रु. ४६७७ कोटी झालें. मध्य व प्रांतिक सरकारांचें करांचें एकंदर उत्पन्न रु. ६११ कोटी झालें. त्याच वर्षी शेतीमालाच्या उत्पन्नाचें प्रमाण एकंदर वार्षिक उत्पन्नांत ५४ टक्के होतें व शेतकरी वर्गापासून कराच्या रूपानें रु. २५॥ कोटी म्हणजे एकंदर वार्षिक सरकारी कर–उत्पन्नाच्या १२ टक्के जमा झाले. बाकीच्या सर्व उत्पादक वर्गाकडून मिळून रु. ५०० कोटी निरनिराळ्या करांच्या रूपानें सरकाला मिळालें. ह्या वर्गाचें एकंदर उत्पन्न सुमारें रु. २२०० कोटी होतें.

रुपयाच्या अवमूल्यनामुळें आयातीचें धोरण व निर्गतीचें धोरण या दोनहि बाबतींत सुधारणा करावी लागल्यामुळें जणूं कांहीं स्थिर असलेल्या आपल्या आर्थिक जीवनाला कांहीं तरी विशेष प्रकारची चालना मिळून तें सुधारूं शकेल असें दिसत आहे.

हिंदमधील बहुतेक सर्व राष्ट्रीय उत्पन्न निरनिराळ्या स्वरूपाच्या खाजगी प्रयत्नांनीं होत असतें. प्रत्यक्ष सरकारी प्रयत्नामुळें राष्ट्रीय उत्पन्नाचा पांच टक्के भाग निर्माण होतो. अर्थ

नसल्यामुळें आर्थिक परिस्थिति सुधारावयाची असल्यास शेती व उद्योगधंदे यांच्या ठिकाणीं उत्पन्नाला चालना देणारी प्रेरक-शक्ति निर्माण झाली पाहिजे. शेती मालाच्या बाबतींत निव्वळ फायद्याचें प्रमाण वाढलें तर सहाजिक रीत्या शेतीचें उत्पन्न वाढविण्यावर भर दिला जाईल. शेती मालाच्या किंमती पांच सहा पट वाढल्या परंतु खर्चाचेंहि प्रमाण वाढल्यामुळें निव्वळ नफ्याचें प्रमाण प्रेरक-शक्ति ठरेल इतकें वाढलें नाहीं. उद्योगधंद्याच्या उत्पन्नांत वाढ होण्यासाठीं खर्चाचें प्रमाण कमी झालें पाहिजे. रॅशनलायझेशनचा उद्देश खर्चाचें प्रमाण कमी करणें हाच आहे. परंतु मजुरांची प्रवृत्ति व भांडवलाचा तुटवडा या दोन गोष्टी विरोधी वातावरण निर्माण करतात. उत्पादनाच्या दृष्टीनें कार्यक्षमता निर्माण करण्याच्या बाबतींत फार मोठ्या अडचणी आहेत.

---

### भारतांतील साबणाचा धंदा

भारतांतील साबणाचें उत्पादन देशांतील गरज पूर्णपणें भागवूं शकेल इतकें वाढविता येईल; सध्याची अशी परिस्थिति आहे कीं, कांहीं थोडी आयात सोडली तर बहुतेक सर्व साबण भारताचे कारखानेच पुरवीत आहेत. गेल्या वीस वर्षांत साबणाची आयात कमी झाल्यामुळें भारताचे जवळ जवळ दोन कोटी रुपये वांचले आहेत. इतकेंच नव्हे तर, ह्या धंद्याच्या वाढीच्या शक्यतेकडे योग्य लक्ष पुरविलें गेलें तर हिंदी साबण परदेशाची बाजारपेठहि मिळवूं शकेल. सध्या भारतांत नोंद झालेले असे ७० साबणाचे कारखाने आहेत. त्या सर्वांची मिळून वार्षिक उत्पादनक्षमता २,४४,००० टन इतकी असावी. परंतु कॉस्टिक सोडा आणि खोबरेल तेल ह्यांच्या टंचाईमुळें प्रत्यक्ष उत्पादन मात्र इतकें होत नाहीं. तथापि कच्च्या मालाच्या ह्या अडचणी आतां बऱ्याचशा दूर झाल्या असून प्रत्यक्ष उत्पादन २ लाख टनाच्या आसपास आलेलें आहे. अशा परिस्थितींत सरकारनें देशांत नवीन साबणाचे कारखाने काढण्यास जी बंदी घातली आहे, तीबद्दल आश्चर्य व्यक्त करण्यांत येत आहे.

---

**सिमेंटच्या वाटपावरील नियंत्रण**—भारत सरकारच्या उद्योग आणि पुरवठा खात्यानें एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. सिमेंटच्या उत्पादनांत बरीच वाढ झाल्यानें १९५० सालीं सिमेंटच्या वांटपावरील नियंत्रणें दूर होतील असें ह्या अहवालावरून दिसतें. कोळशाचें उत्पादनही असेंच वाढलें आहे. १९४९ सालीं ३·१४ कोटी टन कोळसा उत्पन्न झाला. १९४८ सालीं २·९७ टन आणि १९४७ सालीं ३ कोटी टन कोळसा काढण्यांत आला होता. कापडाच्या उत्पादनांत घट झालेली आहे. १९४९ सालीं ३९०·९ कोटी वार कापड तयार झालें. १९४८ सालीं ४३१·९ कोटी वार कापड निर्माण झालें होतें.

**भारतांतील पाकिस्तानच्या चलनी नोटा**—भारतांतील चलनी नोटांची हुबेहुब नक्कल असलेल्या परंतु पाकिस्तान आणि ब्रह्मदेश सरकारच्या निशाण्या असलेल्या कांहीं नोटा हिंदुस्थानांत चोरट्या मार्गानें आणण्यांत आल्या होत्या. ह्या नोटावरील परकीय सरकारच्या निशाण्या मात्र पुसून टाकण्यांत आल्या होत्या. तथापि अशा नोटा संख्येनें फार नसून ही संख्याही कमी करण्याचे प्रयत्न रिझर्व्ह बँक करीत आहे. पाकिस्ताननें आपल्या चलनाचे भाव कमी केलेले नसल्यामुळें पाकिस्तानच्या नोटा भारतांत आडमार्गानें आणल्या जाण्याची शक्यता अर्थातच कमी आहे.

**जपान-ब्रह्मदेश व्यापारी करार**—जपान आणि ब्रह्मदेश ह्या देशांनीं १,७५,००,००० पौंडांचा व्यापारी करार केला आहे. ब्रह्मदेश जपानला तांदूळ, रबर आणि कापूस पुरवणार असून जपानकडून कापड व इतर पक्का माल घेणार आहे.

---


**THE TRAVANCORE OGALE GLASS MANUFACTURING COMPANY LIMITED,**
Manjummel

# NOTICE


The Seventh Annual General Meeting of the Shareholders of the Company will be held on Saturday the 22nd April, 1950, at 5 p. m. at the Registered Office of the Company at Manjummel (Glass Factory Premises) to transact the following business:

1. To receive and adopt the Directors' Report, audited Balance Sheet and Profit & Loss Account for the period ended 31st December 1949.
2. To elect two Directors in place of the retiring Directors, who retire by rotation according to Article 112 of the Articles of Association of the Company and are eligible for re-election and offer themselves as such.
3. To elect a Director in place of Sri. A. P. Tampi, the coopted Director, who retires according to Article 107 of the Articles of Association of the Company and is eligible for re-election and offers himself as such.
4. To appoint auditors for the current year and fix their remuneration.

By Order of the Board,
For Ogale Brothers Limited,
TRIVANDRUM, March 4, 1950 — SHANKARRAO P. OGALE, Managing Agents.

The Share Transfer Books of the Company will be closed from Monday the 10th April to Saturday the 22nd April, 1950, both days inclusive.





हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.